# हे बंध अंतरीचे

१८७५
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३७८

( काव्य संग्रह )

REFBK-0022509
REFBK-0022509

श्री. मा. बा. जोशी
सौ. मनोरमा जोशी

# हे बंध अंतरीचे

( काव्यसंग्रह )

प्रस्तावना – कुसुमाग्रज

संदर्भ
भेट
२३५८
मराठी ग्रंथ संग्रहालय
2358
दा. क्र. 22508

कवि – श्री. मा. बा. जोशी

कवयित्री – सौ. मनोरमा जोशी

REFBK-0022509
REFBK-0022509

कविमंडळ प्रकाशन, नासिक.

हे बंध अंतरीचे

कविमंडळ नासिक, प्रकाशन पृष्प – चवथे

सर्वहक्क मा. बा. जोशी
११०५, नगरपालिकेजवळ,
नासिक – शहर.

मुद्रक ल. य. ओलतीकर
‘ मुद्रिका ’
हुंडीवाला मार्ग, नासिक.

प्रकाशन कविमंडळ, नासिक.

पहिली आवृत्ती एप्रिल १९७५

पृष्ठसंख्या ४४

किंमत चार रुपये

न्यायमूर्ति -
मानवीय राम केशव रानडे
सौ. जानकीबाई रानडे
यांना आदरपूर्वक सप्रेम भेट

नाशिक
दि ०३-४-१९९८

[signature]

सौ. मनोरमा माधव जोशी

# मातृ - स्मृतीस

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ

# प्रस्तावना

## शुभेच्छा

श्री. जोशी आणि सौ. जोशी हे दांपत्य आपल्या अंतरीचे काव्यबंध या छोटया संग्रहाच्या द्वारा वाचकांना सादर करीत आहे. श्री. जोशी यांनी सरकारी नोकरीत अेक कर्तव्यदक्ष आणि सरळ रस्त्याने जाणारा अधिकारी म्हणून लौकिक मिळवला आणि आपल्या स्नेहशील पत्नीच्या सहाय्याने प्रपंचही नेटका केला. श्री. जोशी हे समाधानी मनाने आता नोकरीतून निवृत्त झाले आहेत. 'सज्जनांच्या जीवनाला वेदनेचा शाप का?' असा प्रश्न मनात निर्माण करणारे काही तापदायक अनुभव या दांपत्याला आलेले असणारच.

दिव्याचा प्रकाश मिळविताना दिव्याचा दाहही केव्हा सहन करावा लागतो. पण या अनुभवामुळे जोशी पतिपत्नीची सुजनता खचली नाही किंवा स्वीकृत जीवनमूल्यांवरील त्यांचा विश्वासही ढळला नाही. या समाधानी, सौजन्यशील वृत्तीचे प्रतिबिंब उभयतांच्या या सरळ, साध्याभोळ्या कवितेत पडलेले आहे. प्रौढ वयात त्यांना कवितेची ओळख झाली आणि तिच्यावर त्यांचे अपत्यवत् प्रेम जडले. किंबहुना डोळ्यासमोर चितारलेल्या 'घरकुला'च्या सुंदर स्वप्ना मध्ये जी रिती जागा दैवानं निर्माण केली ती भरून काढण्यासाठी कविता त्यांना सहाय्य करू लागली.

ही कविता अशी आत्मरंजनासाठी, सांत्वनासाठी, भोवतालच्या परिसरापर्यंत मनोगत पोचविण्यासाठी अवतरलेली. तिने निर्मात्याला समाधान दिले हेच महत्त्वाचे. गौरीपुढे हौसेने गाणाऱ्या महिलेच्या गाण्याला रागदारीच्या कठोर कसोटचा लावणे बरोबर नाही. तरीदेखील या संग्रहातील घरकूल, आम्ही वेडे, जीवन संगीत, सज्जनांच्या जीवनाला, आई, मातृस्मृती, अभागी यांसारख्या कित्येक कविता वाचकाच्या मनात सहानुभवाची तार छेडतील यात शंका नाही. या प्रेमळ दांपत्याचे मागणे ‘ लई ’ नाही. त्यांच्या अंगणात फुललेल्या या फुलांचा सुगंध त्यांना लाभला तसा आणखी काही वाचक मित्रांना लाभो– अेवढेच.

ही त्यांची अपेक्षा पुरी होवो !

ही माझी शुभेच्छा– अेक मित्र म्हणून.

वि. वा. शिरवाडकर
( कुसुमाग्रज )

# कृतज्ञता

" हे बंध अंतरीचे " हा आम्हा उभयता पति-पत्नीचा काव्य-संग्रह रसिक वाचकांचे हाती देतांना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

कविमंडळाचे आम्ही उभयता सभासद आहोत. कविमंडळाचा अध्यक्ष म्हणून सेवा करण्याची संधी सतत २ वर्षे मला स्वतःला लाभली आहे. कविमंडळाचे ऋणाचा उल्लेख करणे आम्ही आमचे कर्तव्य मानतो.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांचे ऋण शब्दातीत आहे हस्तलिखितापासून तर काव्यसंग्रह छापून तयार होईपर्यन्तच्या सर्व अवस्थांत तात्यासाहेबांचे हार्दिक मार्गदर्शन लाभले आहे. हा काव्य संग्रह या स्वरुपांत दिसत आहे तो केवळ त्यामुळेच. त्यांच्या " शुभेच्छा " आमच्यासारख्या सर्वसामान्यांच्या पाठिशी असाव्यात हे आम्ही आमचे परमभाग्य समजतो. आम्ही त्यांचे सदैव ऋणी आहोत.

आमचे ज्येष्ठ कविमित्र श्री. कोचरगांवकर वकील, परमस्नेही कवि सर्वश्री पंढरीनाथ सोनवणी, योगेश्वर अभ्यंकर, ग. म. अंधृटकर यांचे सततचे प्रोत्साहन आणि आपुलकीने केलेले सहाय्य यांचाहि उल्लेख करणे आवश्यक आहे आमचे स्नेही श्री. राजाभाऊ गायधनी यांनी हस्तलिखिते पाहून तपासून दिलीत. या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

कागदाची अतिशय टंचाई व इतर अडचणी असतांनाहि उत्कृष्ठ व सुबक छपाई करून दिल्याबद्दल नाशिक " मुद्रिका " मुद्रणालयाचे मालक श्री. ओलतीकर यांचे आम्ही आभारी आहोत.

अतिशय साशंकतेने आणि नम्रतेने हा आमचा प्रयत्न आम्ही आपणापुढे ठेवित आहोत. सर्वसामान्यांच्या सुखदुःखाबद्दलच्या आणि कवितेतील अनुभूति ही कवीचीच अनुभूति या सूत्राचा आधार घेऊन लिहिल्या गेलेल्या या कविता रसिक वाचकांना आवडतील असा विश्वास वाटतो.

। बहुत दिसांची मनिषा अमुची आज सफल झाली ।
। " संग्रह " सेवा सादर करण्या संधि ही लाभली ।
। ये रसिका ये या काव्याचा रसास्वाद घ्याया ।
। "कुसुमाग्रजांची" असे प्रेरणा संग्रह सिध्द कराया ।
। जाणून घेण्या कसे असे " हे बंध अंतरीचे " ।
। एकदा तरी दृष्टी टाकी मुदित मने साचे ।।

संकल्प आणि सिध्दी यांत नेहेमीच अंतर असते. सदर काव्य संग्रह प्रकाशित करण्याचा संकल्प अणि प्रत्यक्षांत त्यांत मिळालेली सिध्दी ही ज्याच्या प्रेरणेने फलद्रुप झाली त्या जगन्नियंत्याला आदरपूर्वक प्रणाम करून आम्ही आपुली अनुज्ञा घेतो.

गुढी पाडवा
दि. १२ एप्रिल १९७५
नासिक.

माधव बाळकृष्ण जोशी
सौ. मनोरमा माधव जोशी

# अनुक्रमाणिका

## कवयित्री - सौ. मनोरमा माधव जोशी


१) हे ईश्वरा करूणाघना
२) ब्रीद
३) माझ्या भारत मातेचा
४) छत्रपति शिवराय
५) सज्जनांच्या जीवनाला
६) नच श्लेष अलंकार
७) घरकुल
८) कविवर्य भा. रा. तांबे यांचे स्मृतिस
९) अंतरीच्या बंधनांनी
१०) जीवन-संगीत
११) हे बंध रेशमाचे
१२) रेशमी नाजुक धागा
१३) आली माहेरवाशीण
१४) नरसोबावाडीचे दत्तस्थान बघुन
१५) पादचारी
१६) पति गेले ग कोल्हापुरी
१७) आम्ही वेडे
१८) आई
१९) बाळा उतराई होऊ कशी
२०) कृष्ण - महिमा
२१) आजीची गोष्ट

## कवि - माधव बाळकृष्ण जोशी

२२) मातृ - स्मृति
२३) हे बंध अंतरीचे
२४) पावन क्षेत्र
२५) जनसेवा
२६) धन्य धन्य शिवाजीराजा
२७) अभागी
२८) गाई यशाची गाथा
२९) वियोग
३०) ध्येयमार्ग स्वीकरी
३१) रांगोळी बघून
३२) अमुचा राम राम घ्यावा

## हे ईश्वरा करुणाघना

हे ईश्वरा करुणाघना श्री राघवा रघुनंदना ॥ धृ ॥
जाणोनिया मम भावना द्यावे तुवा मज दर्शना
सर्वांतरी प्रभु राम तो भक्ता हृदी नित राहतो
झाली कृपा तुमची जरी नाही उणे मग जीवना ॥ १ ॥

वैदेहिच्या प्राणेश्वरा अभय देसी मुनिवरा
दंडोनि असुरा भूवरी सुराज्य आणिले श्रीवरा
नामे रघूकुल भूषणा केले कृतिने सार्थ ना ॥ २ ॥

अेकबाणी अेकवचनी अेकपत्नी श्रीरघुनाथा
ब्रीद राखी ते अलौकिक भक्तवत्सल दीननाथा
केले तुवा जन पालना भरताग्रजा रघुनंदना ॥ ३ ॥

## ब्रीद

ओठी सदा असावे देवा तुझेच नाम
श्रवणात नित्य यावे तव स्तोत्र गूणगान ।
तुझिया कृपाबलाने ही हालचाल चाले
आहेस रोमरंध्री आम्हास नाहि कळले ।
अज्ञान घालवोनी ज्ञानी सुबुद्ध करिसी
माया तुझी बघोनी विस्मीत मी मनासी ।
तू जरिहि मंदिरात असती विटेवरीही
परि पाठिशी उभा तू मज जाणवे सदाही ।
ये त्वरित देवराया ब्रीदास चालवाया
हे नेत्र अधिर झाले मूर्ति तुझी पहाया ।

## माझ्या भारत मातेचा

माझ्या भारत मातेचा आहे मला अभिमान
तिनेच दिले मला संस्कृतीचे वरदान ।। धृ ।।

याच भूमीत जन्मला अेक दानशूर कर्ण
मत्स्यनेत्रास भेदिले पार्थे जिंकोनीया पण ।। १ ।।

प्राणपणाने लढली इथे शूर झाशीवाली
पद्मिनीच्या जोहाराने काया शत्रुची थरथरली ।। २ ।।

युगपुरुष अलौकिक शिवराय छत्रपति
अेकनिष्ठ मावळ्यांचे शौर्य धैर्य वर्णू किती ।। ३ ।।

देश आमुचा पावन सरिता ही गंगामाई
बुद्धि चातुर्याची खाण माता आदर्श जिजाई ।। ४ ।।

संतश्रेष्ठ थोर थोर येथे होऊनिया गेले
देशभक्त क्रांतीवीर राष्ट्रासाठीही झटले ।। ५ ।।

मर्यादा पुरुषोत्तम वाल्मिकीनें वर्णीयेला
धर्मग्रंथ भगवद्गीता कृष्णमुखे प्रगटला ।। ६ ।।

स्वराज्यांत वाढो नित्य माझ्या देशाची या शान
वाणी सदैव आमुची गावो राष्ट्र - गुणगान ।। ७ ।।

## छत्रपति शिवराय

अलौकिक युगपुरुष झाले छत्रपति शिवराय
सुपुत्र असा जिने घडविला धन्य जिजाई माय ॥ धृ ॥

जिवावरीही उदार झाले एकनिष्ठ मावळे
बलिष्ठ शत्रू जिंकुनी त्यांनी स्वराज्य स्थापियले
प्रजाहितास्तव नित्य झटे तो सत्यवादी शिवराय ॥ १ ॥

राजनीतिहि निपुण असोनी निःस्पृहता ती न्यायदानी
निर्भयतेला सदैव वरुनी मातृआज्ञा श्रेष्ठ मानुनी
शिवप्रभूला भाग्ये लाभे रामदास गुरुराय ॥ २ ॥

शूर-वीर अन मुत्सद्दीही रसिकता परि मनी वसे ही
प्राणघातकी संकट येता धैर्यानेही न डगमगता
शहाजी-सुत हा साहस करुनी यशस्वितेचे योजी उपाय ॥ ३ ॥

## सज्जनांच्या जीवनाला

सज्जनांच्या जीवनाला वेदनांचा शाप कां ?
दुर्गुणांच्या वर्तनाला तो तुझा उःशाप कां ? ॥ धृ ॥

दीनता ही लीनता ही लाजवीते का तुला ?
आसुरी उद्दाम होणे आवडे कां हे तुला ?
वाटते वेड्या मनाला मजवरी अन्याय का ? ॥ १ ॥

कर्म अमुचे भोगण्याला लाभला हा जन्म ना
कर्मयोगी होऊनीया संपवावे नियम ना
अंतरी नैराश्य दाटे वाटते संपेल कां ? ॥ २ ॥

आळवावे आठवावे नित्य नैमित्तिक तुला
साथ नाही इंद्रियांची शल्य हे बोचे मला
सत्कृपा व्हावी तुझी ही आस पुरी होईल कां ? ॥ ३ ॥

## नच श्लेष अलंकार

नच श्लेष अलंकार उपमा नसे नि ओवी ।
ते वृत्त छंद यातिल कळते मला न काही ।
परि एक शब्द येतो सामर्थ्य घेऊनीही ।
काव्यात गुंफतांना जणु कोंदणी हिराही ।
अैसीच एक स्फुरली कविता कवीस साधी ।
जी अैकताच होई जागृत ती समाधी ।
भांडार जै खुले तै आकार शब्द घेती ।
आणि अनुभूतिने रसिका मनास भिडती ।

## घरकुल

आहे मनांत माझ्या घरकूल छान एक
आम्ही असूनि दोघे अन् तान्हुलेहि एक ॥ १ ॥
आधी दर्शनी असेल छोटी गणेश मूर्ति
त्या मूर्तिच्या प्रभेने उजळूनि जात भिंती ॥ २ ॥
असुनी विहीर छोटी परसांत पारिजात
ती कृष्ण तुळस शोभे वाटे कसे प्रशांत ॥ ३ ॥
नाही दिवाणखाना साधी प्रसन्न खोली
जय राम कृष्ण हरि या नादे भरुनि गेली ॥ ४ ॥
माता पिता नि बंधू भगिनी नि आप्त येती
सासू श्वशूर आदि गेहास भूषविति ॥ ५ ॥
हा बाळराज खेळे मांडूनि खेळ दारी
त्याचे विमान घेई त्या अंगणी भरारी ॥ ६ ॥
टाळचा पिटीत धावे छोटा विमानतज्ञ
आई पहा – पहा ना माझे उडे विमान ॥ ७ ॥
मम नेत्रि स्वप्न तरळे येई भविष्यकाळ
हो तज्ञ राष्ट्रहीता दीर्घायु होई बाळ ॥ ८ ॥

## कविवर्य भा. रा. तांबे यांचे स्मृतिस

त्या काली असाही   कवी होऊनी गेला
कीं नमिले ज्याने   मावळत्या भानुला   ॥ धृ ॥

जरी अपार श्रद्धा   होती ईशावरती
गाईली गीतांतून   प्रेमाची ही महती   ॥ १ ॥

नववधू लाजरी   पुत्रवियोगी माता
अन पत्नी वियोगी   पुत्रा नुरली माता   ॥ २ ॥

किती विषय कथावे काव्य ही सुंदर सारे
शृंगार करुण रस   चंद्र - चंद्रिका तारे   ॥ ३ ॥

त्या रसिक वृत्तिने   रसास्वाद ही घेता
आणि आदराने हा   विनम्र होई माथा   ॥ ४ ॥

## अंतरीच्या बंधनांनी

अंतरीच्या बंधनांनी बांधुनी मी घेतले ।
माप ओलांडून येता कौतुकाने नाहले ।
भाग्यशाली जीवनी मी सर्व कांहीं लाभले ।
सूरतालासहित गाणे मैफलीचे रंगले ।

## जीवन संगीत

जीवनाच्या संगिताला तू दिला ना सूरताल
म्हणूनीच माझ्या हाती मैफलीचा उष:काल ।। धृ ।।

सूर जुळला ताल जमला खंजीरी मधून डोकावी
मोदाचा हा क्षण समेचा सर्वांनी टाळी द्यावी
परि अचानक त्या विणेची झंकारत तार तुटावी
हाय, म्हणोनी सोडी उसासा कैसे दैवी मायाजाल ।। १ ।।

सरली मैफल गेले सारे उरलो आपण दोघे
तार आवळुनी पुन्हा जुळवुनी उत्साहाने छेडिली वेगे
त्या नादांतच भान हरपलो परि कर्तव्या सदैव जागे
जाणीव ठेवून नश्वरतेची ध्यानी आणला तो गोपाल ।। २ ।।

## हे बंध रेशमाचे

नाते असे अतूट हे स्नेह बंधनाचे
धागे जुळूनी झाले हे बंध रेशमाचे ॥ धृ ॥

जरि वादळेहि झाली आल्या तुफान लाटा
परि तारु स्थिर राहे हे प्रेम संगमाचे ॥ १ ॥

नव्हता दुवाहि उरला परि ओढ अंतरीची
ठेवी सदैव भान कर्तव्य जागृतीचे ॥ २ ॥

तो दूरचा किनारा तो गाठण्यास आता
सामर्थ्य गात्री राहो ईप्सीत हे मनिचे ॥ ३ ॥

ईशास प्रार्थना ही ती साथ ही रहावी
ओठांत नित्य यावे ते नाम ईश्वराचे ॥ ४ ॥

## रेशमी नाजुक धागा

रेशमी नाजुक धागा मनगटावर बांधियेला
बंधु माझा पाठिराखा मजसि भाग्ये लाभलेला ।। १ ।।

बंधु भगिनी प्रेम ऐसे ना कशाची तोड त्याला
बोट हरिचे कापले अन् जीवही व्याकूळ झाला ।। २ ।।

रेशमी हा एक तंतू मानलेले निर्मी नाते
पौर्णिमा वर्षा ऋतूची भगिनीला ही मोद देते ।। ३ ।।

## आली माहेरवाशीण

आली माहेरवाशीण ताई माझी भाग्यवान ।
थांब तिथेच दारांत उतरीते लिंब लोण ।
येती धावत भाचरे झणि माझ्या पाठोपाठ ।
मोद भरला दिसतो नेत्री त्यांच्या काठोकाठ ।
सान बाळाला घेण्यास उतावीळ होती भारी ।
आणि साखर पाप्यांच्या किती झडतात फैरी ।
लगबगीने बाहेरी येती दादा नि वहिनी ।
बाबा म्हणती 'गोकुळ' अवतरले अंगणी ।
जरी प्रेमाचे स्वागत होई ताईचे माहेरी ।
परि मधुनच तिच्या गोड हुरहूर उरी ।

## नरसोबावाडीचे दत्तस्थान बघुन

दत्ताचे हे स्थान प्रशांत प्रसन्न
होऊनिया लीन वंदिले चरण ।। धृ ।।

कृष्णा पंचगंगा
झालासे संगम
दर्शनी आनंद सुखावले मन ।। १ ।।

पतीत तारिले
भक्त उद्धरीले
करोनी कल्याण दिले जीवदान ।। २ ।।

स्वयंभू पादुका
मूर्ति दिसे डोळा
पूजेचा सोहळा बघा थोर सान ।। ३ ।।

मागणे हे आता
पायी भगवंता
संसारी रमता लागो तुझे ध्यान ।। ४ ।।

## पादचारी

मी अेक पादचारी आपुल्या मनी विचारी
ही वाहनेहि सारी अति वेगवान भारी ॥ धृ ॥
जातात ती पहाना डौलात नि त्वरेने
येता समीप कोणी बघतात तुच्छतेने ॥ १ ॥
नाही दिशा तयांना केव्हां कशीहि जाती
बाजूसहि चलाना आम्हास मात्र म्हणती ॥ २ ॥
जातो अम्ही कडेने परि मागुनीहि येती
नादातही तयांच्या कधि लोटुनीहि देती ॥ ३ ॥
मग जागृतीहि येई मार्गास त्याच वेळी
'धावा' कुणी म्हणे हो 'पकडा' अशी आरोळी ॥ ४ ॥
सारे खरे परंतू होई कृती न काही
जो तो उतावळीत गेहास जावयाही ॥ ५ ॥
होई कृतीही जेव्हां परि होतसे उशीर
निर्दोषही म्हणूनी अन् लागतो निकाल ॥ ६ ॥
अैसेच रोज चाले काही नसे उपाय
दे पंख देवराया नमिते तुझेच पाय ॥ ७ ॥

## पति गेले ग कोल्हापुरी

पति गेले ग कोल्हापुरी । सखे ग हुरहूर दाटे उरी
कांहीं सुचेना खाण रुचेना । कामा धामान श्रमले जरी ॥ धृ ॥

सांगितले जपाव जीवाला
खुशालीचे पत्र लिहायला
आले दाराशी मी बघायला
गेला टपालवाला पुढच्या घरी, मी निराश झाले पुरी ॥ १ ॥

निज नाही ग रात्रंदिन
मनि चिंता करी हैराण
युगासमान वाटे क्षण
परि धरोनी धीर मी अधीर मना आवरी ॥ २ ॥

केली देवाचरणी विनवणी
ठेवी सुखांत माझे धणी
त्यांच्या कामात यश येऊनी
परतु दे सत्वर घरी युवराज स्वागता करी ॥ ३ ॥

# आम्ही वेडे

आम्ही आहोत वेडे ठावे असे आम्हाला
या शाहण्या जगांत मग राहणे कशाला ? ।। धृ ।।

हा ही खुळा विचार स्पर्शून हृदयी गेला
परि मोह बंधनांनी हा जीव बांधलेला ।। १ ।।

या शाहण्या जगाची रीती अशीच न्यारी
प्रीती असे तयांची स्वार्थात भारलेली ।। २ ।।

रुचणार नाहि त्यांना त्यागातली कसोटी
मग काय त्यांनि घ्यावे ते रामनाम ओठी ? ।। ३ ।।

वेडे अम्ही म्हणूनी ठरतीच हे शहाणे
कौतुकही अम्हाला अैसे अम्ही दिवाणे ।। ४ ।।

आम्ही जरीहि वेडे सारे कळे अम्हाला
व्यवहार नाहि कांहीं परि धोरणे अम्हाला ।। ५ ।।

आम्हास अेक ठावे राहो सुखांत सारी
यशवंत थोर जगति मिळवोत कीर्ति भारी ।। ६ ।।

# आई

कानांत साद घुमते अजुनी हि आई आई
आणि क्षणैक मूर्ती नेत्रासमोर येई ।। धृ ।।

होता गतस्मृति ती व्याकूळ जीव होई
सोडूनि बाळ गेला दुःखात लोटूनीही ।। १ ।।

कांहीं कळे न मजला अपराध काय झाला
घडला गुन्हा न काही शिक्षा परी मला ही ।। २ ।।

किति मानसी मनीषा त्या थोर बांधियेल्या
परि आज त्या अखेरी साऱ्याच फोल झाल्या ।। ३ ।।

मारील कोण हांक आई म्हणोनि मजसी
नाहीच कां नशीबी ही हांक अैकणेही ? ।। ४ ।।

वेडीच अेक आशा येईल बाळ माझा
घे गोल गोल पापा रडतेस ग ! कशाला ।। ५ ।।

हे स्वप्न सत्य ठरु दे वाटे असे मनी ही
वेडीच अेक माता विनवीत ईशपायी ।। ६ ।।

# बाळा उतराई होऊ कशी

बाळा उतराई होऊ कशी
तुझ्यामुळे मी झाले माता समाधान मजसी ॥ धृ ॥
केले असते लालन पालन
तसे देऊनी उच्चही शिक्षण
कलागुणांना वाव ही देऊन
होती मनीषा मम मानसी उतराई होऊ कशी ॥ १ ॥
तुझे पिताजी भारी प्रेमळ
स्वभाव त्यांचा आहे निर्मळ
दुर्दैवाने अमुच्या केवळ
निराशा आली अशी उतराई होऊ कशी ॥ २ ॥
असे गृहाचा तूं कुलदीपक
सान थोरही करिती कौतुक
हर्ष जाहला तो आत्यंतिक
परि काळाने डाव साधिला नेउनि त्या दिवशी ॥ ३ ॥
पदरी आली घोर वंचना
कुणा कथावी वृथा वेदना
कर्मयोग ही जगतो जाणा
शत्रुलाही दुःख असे हे देऊ नको हृषिकेषी ॥ ४ ॥

## कृष्ण - महिमा

रामकृष्ण हरी मुकुंदा मुरारी
श्रीरंगा श्रीहरी देवा नारायणा ।। धृ ।।

विश्वाच्या चालका तुम्ही दयाघना
गळा वैजयंती माधवा मोहना ।। १ ।।

कंस वधोनीया वारिले भयाते
देवकी नंदना रुक्मीणी रमणा ।। २ ।।

द्रौपदीचा बंधु सुदामाचा सखा
भक्त पाठीराखा कृष्ण भगवान ।। ३ ।।

दुष्टांचा संहार पतीत उद्धार
सोडविल्या नारी केले ते पालना ।। ४ ।।

विश्वरुप दावी भक्त अर्जुनाला
सारथ्य करोनी आणी जयश्रीला ।। ५ ।।

किती गूण वर्णू अलौकीक रुप
अच्युता अनंता वंदिते चरणा ।। ६ ।।

## आजीची गोष्ट

आजीची गोष्ट घुमते कानी
अेक होता राजा न अेक होती राणी
अेक होता राजा न अेक होती राणी
गोष्टीची तऱ्हा ही झाली पुराणी
आता नाही राजा आणि नाही राणी
जनतेचे राज्य हीच घोषवाणी
पुर्वी होत्या घरोघरी चुली मातीच्या
हल्ली आहेत किचनमध्यें शेगडचा गॅसच्या
हल्लीच्या माणसांना उसंत नसते
त्यांच्यामागे सदाच धावपळ असते
पुर्वीच्या आजीला काकडचाची घाई
हल्लीच्या आजीला डब्याची घाई
घाईच्या ह्या जीवनात खूप प्रकार असतात
बस लोकल टॅक्सी विमाने धावतात
संप मोर्चे लाठीमार गोळीबार अश्रुधूर
त्यांना तोंड देतांना काळजीला येतो पूर

महागाई सतत असते तोंड 'आ' वासून
बजेट बसवतांना जीव जातो त्रासून
अशा या गोंधळात रामनाम येत नाही
संकटकाळी आठवतो म्हणतो धावून येई
संकटांच्या तऱ्हा वेगवेगळ्या असतात
त्यांच्याशी झुंजतांना माणसे वैतागतात
नित्याच्या गरजा नोकरी अन् घर हवे
सारे कसे मनासारखे व्हायला हवे
तसे मात्र होत नाही निराशा पदरी येते
दैवाला दोष देऊन मन आक्रंदत राहते
आजी माळ जपते देवघरात बसून
विचारते देवाला बसला कां रुसुन
मागणे ती मागते सुखी ठेव सर्वांना
समृद्धीचे जीणे देऊन करी कृपादाना
पाठी येऊन मिठी घातली गळा आजीच्या
जीवनाचे सार्थक झाले वाटे मनि तिच्या
गोष्ट ऐकायची नातवाला झाली घाई
आजीचे नेत्र पैलतीरी गोष्टीत मनच नाही

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2346
दा. क्र. 22405
शाखा (कल्याण)

## मातृ - स्मृति

कोण फिरविल गे पाठीवरुनि
मायेचा हात ।

कोण विचारील " बाळ आला कां ? "
संध्या समयास ।

अंगावरची तुझी घोंगडी देते
मजला ऊब ।

स्मृति तुझ्या त्या नित्य आणतील
मजलागी जाग ।

# हे बंध अंतरीचे

हे बंध अंतरीचे तुटता कधी तुटेना
धाग्यात एक धागा जुळला कधी कळेना ॥ १ ॥

जव देखिले तुला गे हुरहूर लागी जीवा
माझाच मी न राही कळले मलाच तेव्हां ॥ २ ॥

स्वर्गीय प्रीत फुलली मनमंदिरीच स्फुरली
सहवास तव घडावा ही एक आस उरली ॥ ३ ॥

हा दैवयोग जुळला अपुला विवाह झाला
मम पत्नी गे म्हणूनी सदनी प्रवेश केला ॥ ४ ॥

संसार रूपि रथ हा हाकू मिळूनि दोघे
लाभो सदैव वाटे आधार मज तुझा गे ॥ ५ ॥

ऋतुराज वसंत आला पानी मोहोर फुलला
चाहूल नव जिवाची लागे, आनंद झाला ॥ ६ ॥

काही उणे न मजला या जीवनी अता गे
लाभो सदाच साथ मम ध्येयपूर्तिला गे ॥ ७ ॥

# पावन क्षेत्र

श्रीरामाच्या चरणस्पर्शे पावन हे ग्राम
गोदा – अरुणा – सरस्वतीचा झालासे संगम ॥ १ ॥

उभय तटावर शोभतात ती सुंदर देवालये
संस्कृत प्राकृत परराष्ट्रीयही भाषा विद्यालये ॥ २ ॥

प्रसिद्ध असती द्राक्ष मळेही दिसती मंडप छान
उद्योगाचे क्षेत्र वाढले झाली उंचही मान ॥ ३ ॥

कथा कीर्तने तशी प्रवचने तात्त्विक वादविवाद
कविमंडळे नाट्य प्रयोगही कधी मधी परिसंवाद ॥ ४ ॥

इथेच झाले शास्त्री पंडित अनेक क्रांतीवीर
इथे निपजले देशभक्तही वक्ते अन् शाहीर ॥ ५ ॥

इथे राहती कवी नि लेखक आणि नाटककार
गायन – वादन कलानृत्यही करिती ते साकार ॥ ६ ॥

चित्रकार कुणि चित्र चितारी घाटावर बसुनी
भवतालीचे भान नसे त्या अेकचित्त होऊनी ॥ ७ ॥

## जनसेवा

संत महंत दामाजीपंत
मंगळवेढी दयावंत ।
दीन दुबळे सान थोर
मुक्त केले धान्य भांडार ।
नाही पाहिले स्वार्थाला
अंगीकारी मानवतेला ।
कान्होपात्रा चोखामेळा
भक्तीमार्ग दावी वेळोवेळा ।
कितीतरी ऐशी नांवे
जनता जनार्दनी भावे ।
देशसेवा ईश्वरसेवा
कलियुगी मंत्र व्हावा ।
कृपालोभ चित्ती ठेवा
करा जनतेची सेवा ।

## धन्य धन्य शिवाजीराजा

धन्य धन्य शिवाजी राजा झटला ऽ प्रजाहित काजा ।। धृ ।।
वाहिली शपथ मंदिरी
स्थापीन स्वराज्या परि
दुमदुमली ती रणभेरी
हरहर महादेव हो गर्जा झटला ऽ प्रजाहित काजा ।। १ ।।
जमविले मावळे शूर
घेऊनि भवानी तलवार
ठावे न कधी माघार
प्रेरणा देतसे जीजा झटला ऽ प्रजाहित काजा ।। २ ।।
सत्यनिष्ठ धीर अन् वीर
युगपुरुष जाहला थोर
जणु शिवाचाच अवतार
तज्ञ-सूज्ञ-न्यायी हा राजा झटला ऽ प्रजाहित काजा ।। ३ ।।
जिंकिले गड अवघड
पराक्रमासी नाही तोड
शक्ति युक्ति बुद्धी अजोड
फोडिला तिमीर दरवाजा झटला ऽ प्रजाहित काजा ।। ४ ।।
राज्याभिषेक तो करविला
ध्वज-दिन साजरा केला
आनंदी आनंद जाहला
शतवार नमन महाराजा झटला ऽ प्रजाहित काजा ।। ५ ।।

## अभागी

प्रभात झाली वाहु लागला सुखद पवन तो अहा
फटाकडे अन् फुलबाज्यांचे गोड दृश्य ते पहा ।
जो तो उठतो घाईमध्ये लागे कार्याला
एक बोलवी दुसऱ्याला हो घरी फराळाला ।
आनंदाने पक्षी गाती पाही तरुवरती
रविराजाचे जणू स्वागता सिद्ध बहू असती ।
सृष्टी देविने शालू हिरवा केला परिधान
पिवळे रंगित काठ तयांचे दिसताती छान ।
आनंदाचे झुळझुळ झुळझुळ झरे वाहतात
परंतु अैशा समयी कोणी होता दुःखात ।
हाय ! अभागी आपण, नाही भगिनी अपणाला
वाईट बहुतची वाटत होते घडीघडी त्याला ।
कष्टामध्ये दिवस काढला त्याने तो सगळा
सायंकाळी नदीतीरावर जाऊनिया बसला ।
'बंधू घालील ओवाळणि अजि आत्मभगिनीला
मनांत येता अश्रू खळकन् डोळ्यांतुनि पडला ।
अश्रू अविरत येउ लागले एकांती त्यास
बघू नये कोणीही अपणा वाटे चित्तास ।

## गाई यशाची गाथा

कां असा निराश आणि क्रियाशून्य बा होसी
काय अन् कसे करु अशी खंत मनी धरसी ॥ १ ॥

ऊठ झडकरी कार्या लागी नव उत्साहाने
आळस झटकुनि करी प्रारंभा कायावाचामने ॥ २ ॥

धैर्य मानसी जोर मनगटीं आणुनि लवलाहीं
सोडी भीती पाउल टाकी मार्ग पुढे पाही ॥ ३ ॥

दृष्टी टाकी तूं इतिहासी युवका स्फूर्ति घेई
स्वस्थ बैसणे माहित नसु दे लगबग वेगे जाई ॥ ४ ॥

स्वराज्य आपुले सुराज्य करण्या कटीबद्ध होता
तुझ्याकडे आशने बघते अपुली भारत माता ॥ ५ ॥

" कर्मण्येवाधिकारस्ते " सांगे भगवद्-गीता
वैफल्याचे भाव सोडुनी गाइ यशाची गाथा ॥ ६ ॥

# वियोग

प्रभूचा कोप हा झाला गुरुजीस घेउनी गेला
तुझी ही रिती कां ऐशी चांगल्या घेऊनि जाशी ।
अंध अन् पंगु किति असती सारे अन्नास्तव फिरती
नकोसा जीव ज्या होतो प्रभू त्या आयु बहु देतो ।
प्रयत्ने लावी गळफास ईश त्या देई ना यश
परंतु सज्जनाला या नेऊनि शिणविली काया ।
संगति नावडे आपणा आमुची फार दिवसांची
म्हणूनि सोडूनि गेला आम्हाला ईशलोकाला ।
जगी या भ्रष्टाचाराचा, पसारा माजला सारा
न्याय नीती नाही उरली विफलता कां मनी भरली ? ।
टाळण्या सर्व ते गेला ठरवूनी स्वर्गभूमिला
आपुला आठव होतो शिष्यगण फार हळहळतो ।
" जगी ज्या असती वस्तुजात नष्टता त्यास येणार "
जगाच्या आदिपासोनी तत्त्व जे पुढे चालणार ।
परंतू दुःख मनि वाटे जेधवा स्मृती होई मजला
परमेशा शांती द्यावी मृताच्या अमर आत्म्याला ।

## ध्येय मार्ग स्वीकरी

घेई भरारी वरी युवका ध्येय मार्ग स्वीकरी ।। धृ ।।

नवतारुण्ये जीवन भरले
रम्य बालपण तेही सरले
राष्ट्रघटक मी हेहि उमगले
मग चालु लाग सत्वरी युवका ध्येयमार्ग स्वीकरी ।। १ ।।

मार्गी तव बहु कांटे असती
" कांट्यामधुनी गुलाब येती "
तत्त्व असे हे कसे विसरशी
धैर्य मानसी धरी युवका ध्येय मार्ग स्वीकरी ।। २ ।।

धोंडा मोठा खळगे खांचा
लेश नसे जरि पथि सौख्याचा
धडा परंतु करी मनाचा
लंघण्यास पथ करि तयारी युवका ध्येयमार्ग स्वीकरी ।। ३ ।।

दिसू लागल्या संकट सरिता
तरुनी जाई न उगमगता
असल्या कामी दावि निपुणता
तुज अपयश आले जरी युवका ध्येयमार्ग स्वीकरी ।। ४ ।।

हे बघ आले यशोमंदिर
मार्ग चालूनि दमशी फार
घेई विसावा मानि आभार
परमेशाचे मनि सत्वरी युवका ध्येयमार्ग स्वीकरी ॥ ५ ॥

नवे नवे ते शोध लागती
ध्येयास्तव आत्माहुति देती
उद्दिष्ठाला चिटकुनि बसती
नांव तयांचे गाजत राही परि, युवका ध्येयमार्ग स्विकरी ॥ ६ ॥

## रांगोळी बघून

शिवरायाचे चरित्र ग्रथिले रांगोळी मधुनि ।
प्रसंग बहुविध साकारिले विविध रंग भरुनि ।
आनंदाने मन बहु धाले रम्य भाव बघुनि ।
अमरपुरीच्या बालचमूचे कौतुक वाटे मनी ।

## अमुचा राम राम घ्यावा

( एका सेवानिवृत्ताचे मनोगत )

आम्हा प्रेमे निरोप द्यावा अमुचा राम राम घ्यावा ।। धृ ।।

अडिच तपे जी सेवा केली
गोड मानुनि तुम्ही घेतली
कधी न्यूनता नाहि भासली
नाहि कुणाचा केला हेवा अमुचा राम राम घ्यावा ।। १ ।।

अनेक गांवे अनेक खेडी
फिरण्यांत मानिली गोडी
संधी लाभली परि जी थोडी
अनुभव गाठी नित्य नवा अमुचा राम राम घ्यावा ।। २ ।।

प्रेम दिले मज अति जनतेन
साक्ष देतसे मम अंतरमन
उतराई मी कसा होईन
संधि मिळावी करण्या सेवा अमुचा राम राम घ्यावा ।। ३ ।।

REFBK-0022509
REFBK-0022509

दिवस आजचा संक्रमणाचा
दावी मार्ग जो उत्क्रांतिचा
सेवाक्षण हा कृतार्थतेचा
आपुलकी अन् निष्ठा ठेवा अमुचा राम राम घ्यावा ।। ४ ।।

समाधान बहु माझे चित्ति
जरी घेतसे अजि निवृत्ती
सहकारावरी माझी भक्ति
समृद्धीचा आहे ठेवा अमुचा राम राम घ्यावा ।। ५ ।।

मजकरवि अन्याय जाहला
अधिक उणे बोललो कुणाला
उदार होऊनी करा क्षमेला
निवृत्तीतही साधिन सेवा अमुचा राम राम घ्यावा ।। ६ ।।